सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# नागरिकांची सनद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

## महाराष्ट्र शासन

## प्रकल्प अधिकारी

### एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
### भंडारा, जिल्हा भंडारा

दुरध्वनी क्रमांक ०७१८४-२५१२३३, २५८७१७

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,**
**भंडारा, जिल्हा भंडारा**

**प्रस्तावना:-**

आदिवासींच्या शैक्षणीक, आर्थीक, सामाजिक विकासाच्या दृष्टिने सन १९८३ या वर्षा आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली . सन १९९२ मध्ये पुनर्रचना करुन २४ प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. १८ जुन २०१२ मध्ये नव्याने ०५ प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. सध्या २९ प्रकल्प अस्तित्वात आहेत. देवरी जि. गोंदिया प्रकल्पाचे विभाजन करुन भंडारा जिल्ह्याकरिता स्वतंत्र एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, भंडारा, ऑगस्ट २०१२ मध्ये सुरु झाले व या प्रकल्पामध्ये संपुर्ण भंडारा जिल्हयाचा समावेश आहे. भंडारा जिल्हयाची लोकसंख्या १२,००,३३४ आहे व त्यापैकी आदिवासी लोकसंख्या ८८,८८६ आहे. आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी ७.४१ एवढी आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा जि. भंडारा या कार्यालयाच्या कायक्षेत्रात संपुर्ण भंडारा जिल्ह्याच समावेश होतो. भंडारा जिल्ह्यातील सातही तालुके आदिवासी उपयोजना बाहेरील क्षेत्रात (ओटिएसपी) मध्ये समाविष्ट आहेत. माडा पॉकेट अंतर्गत ६० गावांचा समावेश होतो.

या कार्यालयांतर्गत शैक्षणिक विकासाच्या दृष्टिने **०१** शासकीय व ०८ अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत. त्यामध्ये अनुक्रमे ११० व १६५४ एकुण १७६४ विद्यार्थी पटावर आहेत. आदिवासी मुलां-मुलींकरिता तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर एकुण ०९ वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यात एकुण ६१० विद्यार्थी प्रवेशित आहेत तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीकरिता विविध उपक्रम राबिवण्यात येतात.

भंडारा जिल्ह्याकरिता ओटिएसपी व मिनी माडा क्षेत्रातील भागाचा सर्वांगिन विकास करण्याकरिता जिल्हा नियोजन समिती मार्फत जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना राबविण्यात येते. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाचा मोठा भाग आदिवासींना प्रत्यक्ष लाभ देणा-या योजनांसाठी केला जातो, जसे लघुपाटबंधा-याच्या योजना, मृदु व जलसंधारण, ग्रमीण पाणी पुरवठा, जोड रस्ते, आरोगयाच्या सुविधा, शबरी घरकुल ग्रीण विद्युतीकरण ई. साठी जिल्हावार्षिक आदिवासी उपयोजनामध्ये दरवर्षी जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांना आदिवासी भागाकरिता सोयी सुविधा निर्मान करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

आदिवासी उपयोजनेअंतर्गत राज्य व जिल्हास्तरावर आदिवासी कल्याणाकरिता "मागासवर्गीय कल्याण" उपयोजना विकास घटकांतर्गत शिष्शवृत्ती, वसतिगृहे, आश्रमशाळा, विविध कौशल्य विकास आधारित योजना, ठक्कर बाप्पा वस्ती सुधार यांजना, सामुहिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात.

आदिवासींच्या आर्थिक उन्नतीकरिता आदिवासी कुटुंबाचा विकास हा मुख्य उद्देश मानुन वैयक्तीक लाभाच्या विविध योजना, सामुहिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. त्यात प्रामुख्याने तेलपंप पुरवठा, एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा, कन्यादान योजना, स्वाभिमान योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत विविध योजना, शबरी घरकुल बांधकाम, गांव विकासाच्या दृष्टिने ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भारत सरकार शिष्यवृत्ती, शाळेतील गळती थांबविण्यासाठी सुवर्णमहोत्सवी अपंग शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी, ई. योजना राबविल्या जातात. व्यवसाय प्रशिक्षण केंद चालविणे ही योजना आदिवासी बेरोजगार यंवकांसाठी राबविण्यात येते. तसेच सुशिक्षित बेरोजगारांची नांव नोंदणी करुन ईतर विभागाच्या मागणीनुसार शैक्षणीक पात्रतेनुसार रोजगाराकरिता याद्या पाठविण्यात येतात.

शासनातर्फे राबविण्यात येणा-या आदिवासींच्या कल्याणकारी योजनांचे स्वरुप, उद्दिष्टे, निकष, पात्रता ई. माहिती जनतेस व्हावी यादृष्टिने नागरिकांची सनद प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा जि. भंडारा मार्फत प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठिकाण:- भंडारा

दिनांक:-

(निरज एस.मोरे)
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
भंडारा.

अनुक्रमनिका


| अ.क्र. | योजनेचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | अ) शैक्षणिक विकासाच्या योजना | |
| १ | शासकीय आश्रमशाळा समुह योजना | ५ ते ६ |
| २ | स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य | ६ ते ८ |
| ३ | शासकीय आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे | ८ ते ९ |
| ४ | आदिवासी मुला/मुलींची शासकीय वसतिगृहे | ९ ते ११ |
| ५ | नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देणे | ११ ते १२ |
| ६ | अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेत प्रवेश देणे | १२ |
| ७ | आदिवासी उमेदवारांची सेवायोजन अंतर्गत नांव नोंदणी करणे | १३ |
| ८ | सुवर्ण महोत्सवी आदिवासी विद्यार्थ्यांना पुर्व माध्यामिक शिष्यवृत्ती योजना | १३ ते १४ |
| ९ | आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षेत्तर शिष्यवृत्ती योजना (भारत सरकार शिष्यवृत्ती योजना) | १४ ते १५ |
| १० | व्यावसायिक पाठ्यक्रम शिकणा-या अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना पुरक निर्वाह भत्ता देणे | १५ ते १६ |
| ११ | अनु. जमातीच्या इयत्ता ८ वी ते १२ वी च्या वर्गात शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे | १६ |
| १२ | पंडित दिनदयाल स्वयमं योजना | १७ |
| १३ | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लीअस बजेट)योजना | १७ ते १८ |
| १४ | विशेष केंद्रिय सहाय्य योजना | १८ ते १९ |
| १५ | भारतिय सविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत सहाय्य | १९ |
| | ब) आर्थिक उन्नतीच्या योजना | |
| १६ | अनु. जमातीच्या शेतक-यांना तेलपंप पुरवठा करणे | १९ ते २० |
| १७ | अनु. जमातीच्या शेतक-यांना पह.व्ही.सी./एच.डी. पी.ई. पाईपचा पुरवठा करणे | २० |
| १८ | भमिहिन दारिद्य रेषेखालील आदिवांसींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना | २१ |
| १९ | शबरी घरकुल योजना | २२ |
| २० | राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना | २३ |
| २१ | ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार यांजना | २४ ते २५ |
| २२ | आदिवासी सेवक पुरस्कार योजना | २५ ते २६ |
| २३ | माहितीचा अधिकार अधिनियम | २६ |
| २४ | भंडारा जिल्हयातील आदिवासी लोकसंख्या (तालुका निहाय) | २७ ते २९ |

## १) शैक्षणिक विकासाच्या योजना

**१. शासकीय आश्रमशाळा समुह योजना**

उद्देश व स्वरुप:-

महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसुचित जमातीची सामाजीक व शैक्षणीक प्रगती होण्यासाठी सन १९७२-७३ पासुन क्षेत्रविकासाचा दृष्टिकोन स्विकारण्यात आला. अशा भगाचा मुलभुत विकास व्हावा आणि त्याचा फायदा सर्वांना व्हावा यासाठी मुळ केंद्रस्थान म्हणुन आश्रमशाळा असावी. या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची ईयत्ता १० वी व १२ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, अंथरुण-पांघरुण पुस्तके व इतर लेखन साहित्य ई.सुविधा शासनाकडुन पुरविण्यात येतात.

वैशिष्ट्ये:-

१) आश्रमशाळेत इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते.
२) बायोमेट्रिक पध्दतीने विद्यार्थ्यांची व कर्मचा-यांची हजेरी घेण्यात येते.
३) दृकश्राव्य साधनांचा वापर करुन शिक्षण दिल्या जाते.
४) नास्त्यासोबत अंडी, केळी व मोसमी फळफळावळे दिल्या जाते.
५) जेवणामध्ये बक-याचे/कोंबडीचे मटन, मासोळी, कडधान्य व पालेभाजी, कंदभाजी दिल्या जाते.
६) शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन केल्या जाते. उदा. सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, भाषण, चित्रकला स्पर्धा इ.
७) पायाभुत अभ्यासक्रम तयार करुन विहित शिकवणी दिल्या जाते.
८) विविध सार्वजनिक सण शाळेतच साजरे केल्या जातात त्या करिता विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित केल्या जाते.
९) सातत्यपुर्ण सर्वकष मुल्यमापन केल्या जाते.
१०) विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी वैद्याकीय तपासण्या केल्या जातात.

पात्रता व प्रवेशाची पध्दत:-

१) विद्यार्थी हे अनुसुचित जमातीचे असावे.
२) प्रवेशपात्र विद्यार्थ्याचे वय ३१ जुलै ला ६ वर्ष पुर्ण असावे.
३) आश्रमशाळेच्या १ कि.मी. परिसरातील मुले-मुली अनिवासी म्हणुन व त्या क्षेत्राच्या बाहेरिल निवासी म्हणुन प्रवेशीत राहतील.
४) आश्रमशाळेत प्रत्येक वर्गात निवासी ४० व बहिस्त १० विद्यार्थी
५) आश्रमशाळेत मुला-मुलींचे प्रमाण ५०:५० प्रमाणे ५०% मुली मिळाल्या नाही तर विद्यार्थीनीची क्षमता किकमान ३३% आवश्यक. जर सदर टक्केवार पुर्ण झाली नाही तर आदिवासी मुलांना प्रवेश देऊन क्षमता पुर्ण करणे.
६) आश्रमशाळांमध्ये प्रत्येक वर्गात शारिरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांसाठी ३% आरक्षण राहील.
७) दारिद्रय रेषेखालील/भुमीहीन/अल्पभुधारक विद्यार्थ्यांना प्राधान्य

प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे:-

१) जातिचा दाखला उपविभागीय अधिकारी यांचा असावा.

२) जन्म तारखेचा दाखला असावा.

३) आई वडिलांचे प्रतिज्ञापत्र

४) रहिवासी दाखला

५) पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पुर्वीच्या शाळेच्या शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रिका.

संपर्क:-

संबंधित शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक

तक्रार निवारणासाठी:- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

| अ.क्र. | शाळेचे नांव | इयत्ता | मुख्याध्यापकाचे नांव | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय माध्यामिक आश्रमशाळा, खापा(खुर्द)ता. तुमसर | १ ते १० | श्री.जी.एस. फुले | ८६६८४६९३८७ |

**कालबध्द कार्यक्रम:-**

| अ.क्र. | नियोजन | संभाव्य कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण | दिनांक २० एप्रील ते ३० एप्रील |
| २ | शाळेस लागणा-या अन्नधान्य व ईतर साहित्याची मागणी नोंदविणे | दि. २ मे ते १५ मे |
| ३ | शाळा पुर्वतयारी (पंधरवाडा नियोजन) | दि. २५ जुन ते १० जुलै |
| ४ | प्रवेश प्रक्रीया (प्रवेश अर्ज स्विकृती) | दि. २ मे ते ३० सप्टें. |
| ५ | साहित्य वाटप | दि. २५ जुन ३० जुन |
| ६ | भाजीपाला पुरवठा आदेश प्राप्त करुन घेणे | दि. २ मे ते २५ जुन |
| ७ | मुल्यमापन चाचण्या | महिण्यातुन किमान एक चाचणी |
| ८ | प्रथम सत्रात परिक्ष | दिवाळीपुर्वी |
| ९ | द्वितिय सत्रात परिक्षा | एक एप्रील ते १५ एप्रील |
| १० | क्रिडास्पर्धा आयोजन (केंद्रस्तर) | आक्टोबरचा शेवटचा आठवडा |
| ११ | क्रिडास्पर्धा (प्रकल्प स्तर) | नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| १२ | सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन | २६ जानेवारी |
| १३ | पालक मेळावा | जुन महिण्याचा शेवटचा आठवडा |
| १४ | शाळा व्यवस्थापन समिती | जुलै महिण्याचा पहिला आठवडा |

## २) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य

उद्देश व स्वरुप:-

आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता कार्यरत असलेलल्या स्वेछ्चा संस्थामार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना शासनाचे नियमानुसार अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शैक्षणीक साहित्य व ईतर सवलती मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याकरिता कर्मचा-यांचे वेतन व परिरक्षणाकरिता विहित अनुदान शासनाकडुन देण्यात येते.

अनुदानित आश्रमशाळेतिल सोयी सुविधा:-

१) इमारत:-

(अ) प्रत्येक वर्गाला वर्गखोली, प्रयोगशाळा कक्ष, ग्रंथालय कक्ष, स्टॉफ रुम, भांडार गृह, सिकरुम, मुख्याध्यापक व अधिक्षका करिता कार्यालय असावे.

(ब) मुलां/मुलींकरता शासनाच्या मानकाप्रमाणे वसतिगृह ईमारत असावी, शासनाच्या मानकाप्रमाणे शौचालय व स्नानगृहे

असावीत.

(क) स्वयंपाकगृह, भोजनगृह व कोठीगृह स्वतंत्र असावे.

(ड) शाळेला संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे.

२) भोजनाबाबत:-

(अ) सकाळ संध्याकाळ पौटभर जेवण, सकाळी नास्ता, अंडी /केळी, फळ फळावळे ई. देण्यात यावे. जेवणामध्ये योग्य

प्रमाणात कंदभाजी, फळभाजी व पालेभाजी नियमित देण्यात येते.

(ब) महिण्यातुन दोनवेळा बक-याचे/कोंबडीचे ताजे मटन देण्यात येते. मटन न खाणा-या विद्यार्थ्यांना मिष्टांन देण्यात येते.

प्रवेशाच्या पात्रता:-

१) विद्यार्थी हे अनुसुचित जमातीचे असावे.

२) प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे वय ३१ जुलै ला ६ वर्ष पुर्ण असावे.

३) आश्रमशाळेच्या १ कि.मी. परिसरातील मुले-मुली अनिवासी म्हणुन व त्या क्षेत्राच्या बाहेरिल निवासी म्हणुन प्रवेशीत

राहतील.

४) आश्रमशाळेत प्रत्येक वर्गात निवासी ४० व बहिस्त १० विद्यार्थी

५) आश्रमशाळेत मुला-मुलींचे प्रमाण ५०:५० प्रमाणे ५०% मुली मिळाल्या नाही तर विद्यार्थीनीची क्षमता किमान ३३% आवश्यक आहे. जर सदर टक्केवार पुर्ण झाली नाही तर आदिवासी मुलांना प्रवेश देऊन क्षमता पुर्ण करणे.

६) आश्रमशाळांमध्ये प्रत्येक वर्गात शारिरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांसाठी ३% आरक्षण राहील.

७) दारिद्य रेषेखालील/भुमीहीन/अल्पभुधारक विद्यार्थ्यांना प्राधान्य

अनुदानित आश्रमशाळेस मान्यतेकरिता अटी:-

१) संस्था नोंदणीकृत असली पाहिजे.

२) विहित नमुन्यात आश्रमशाळा सुरु करण्याच्या ठिकाणाचे सर्वेक्षण, उपलब्ध विद्यार्थी संख्या, संस्थेची आर्थिक स्थिती, आदिवासी क्षेत्रातील कार्य ई. माहितीसह अर्ज करणे आश्यक.

संपर्क:-

१) संबंधित अनुदानित आश्रमाळेचे मुख्याध्यापक--

२) तक्रार निवारणासाठी:- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

| अ.क्र. | अनुदानित आश्रमशाळेचे नांव | इयत्ता | मुख्याध्यापकाचे नांव | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | अनुदानित आश्रमशाळा, येरली, त. तुमसर | १ ते १२ | श्री. आर. एन. बडवाईक | ९९२३६८६६५९ |
| | | | श्री.एम.व्ही. टेकाम | ९९२३३२४६२६ |
| २ | अनुदानित आश्रमशाळा, चांदपुर, त. तुमसर | १ ते १० | श्री. एस.एस. शेन्डे | ९५७९१८९५१० |
| ३ | अनुदानित आश्रमशाळा, पवनारखारी, त. तुमसर | १ ते ७ | श्री. ए. व्ही. वरकडे | ९६७३५७८९०५ |
| ४ | अनुदानित आश्रमशाळा, आंबागड, त. तुमसर | १ ते १० | श्री. आर. आर. राऊत | ९७६३५१७२९९ |
| ५ | अनुदानित आश्रमशाळा, कोका (जंगल) त. भंडारा | १ ते १२ | श्री. के. आर. सार्वे | ७७४३९८३३२० |
| ६ | अनुदानित आश्रमशाळा, आमगांव(आदर्श) त. पवनी | १ ते १० | श्री. डी. ए. रेहपाडे | ९४२१८०४६४४ |
| ७ | अनुदानित आश्रमशाळा, माडगी त. भंडारा | १ ते १० | कु. पी. एम. शहारे | ९७६४०२४४३३ |
| ८ | अनुदानित आश्रमशाळा, जांभळी (खांबा) त. साकोली | १ ते १० | श्री.टि.एस. धुर्वे | ८४१२९०४००८ |

कालबध्द कार्यक्रम:-

| अ.क्र. | नियोजन | संभाव्य कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण | दिनांक २० एप्रील ते ३० एप्रील |
| २ | शाळेस लागणा-या अन्नधान्य व ईतर साहित्याची मागणी नोंदविणे | दि. २ मे ते १५ मे |
| ३ | शाळा पुर्वतयारी(पंधरवाडा नियोजन) | दि. २५ जुन ते १० जुलै |
| ४ | प्रवेश प्रक्रीया (प्रवेश अर्ज स्विकृती) | दि. २ मे ते ३० सप्टें. |
| ५ | साहित्य वाटप | दि. २५ जुन ३० जुन |
| ६ | भाजीपाला पुरवठा आदेश प्राप्त करुन घेणे | दि. २ मे ते २५ जुन |
| ७ | मुल्यमापन चाचण्या | महिण्यातुन किमान एक चाचणी |
| ८ | प्रथम सत्रात परिक्षा | दिवाळीपुर्वी |
| ९ | द्वितिय सत्रात परिक्षा | एक एप्रील ते १५ एप्रील |
| १० | क्रिडास्पर्धा आयोजन(केंद्रस्तर) | आक्टोबरचा शेवटचा आठवडा |
| ११ | क्रिडास्पर्धा (प्रकल्प स्तर) | नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| १२ | सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन | २६ जानेवारी |
| १३ | पालक मेळावा | जुन महिण्याचा शेवटचा आठवडा |
| १४ | शाळा व्यवस्थापन समिती | जुलै महिण्याचा पहिला आठवडा |

## ३) शासकीय/अनुदानित आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालये सुरु करणे

उद्देश व स्वरुप:-

शासकीय आश्रमशाळांमध्ये ईयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले अनुसुचित जमातीचे विद्यार्थी अडचणीमुळे तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकत नाही. शासकीय आश्रमशाळांमध्येच

त्यांना उच्च माध्यामिक शिक्षण घेता यावे या उद्देशान शासनाने सन १९८९ पासुन आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शासकीय माध्यामिक आश्रमशाळेत कला व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालये सुरु केलेली आहेत.

वैशिष्ट्ये:-

१) आश्रमशाळेत ईयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते.
२) बायोमॅट्रिक पध्दतीने विद्यार्थ्यांची व कर्मचा-यांची हजेरी घेण्यात येते.
३) दृकश्राव्य साधनांचा वापर करुन शिक्षण दिल्या जाते.
४) नास्त्यासोबत अंडी, केळी व मासमी फळफळावळे दिल्या जाते.
५) जेवणामध्ये बक-याचे/कोंबडीचे मटन, मासोळी, कडधान्य व पालेभाजी, कंदभाजी दिल्या जाते.
६) शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन केल्या जाते. उदा. सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, भाषण, चित्रकला स्पर्धा इ.
७) पायाभुत अभ्यासक्रम तयार करुन विहित शिकवणी दिल्या जाते.
८) विविध सार्वजनिक सण शाळेतच साजरे केल्या जातात त्या करिता विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित केल्या जाते.
९) सातत्यपुर्ण सर्वकष मुल्यमापन केल्या जाते.
१०) विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी वैद्याकीय तपासण्या केल्या जातात.

प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे:-

१) जातिचा दाखला उपविभागीय अधिकारी यांचा असावा
२) शाळा सोडल्याचा दाखला
३) आई वडिलांचे प्रतिज्ञापत्र
४) रहिवासी दाखला
५) इयत्ता १० वी ची गुणपत्रिका

संपर्क:-

संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य

तक्रार निवारणासाठी:-

सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुदानित आश्रमशाळा, येरली त. तुमसर | १ ते १२ | माध्य. मुख्या.- आर.एन. बडवाईक | मो.नं.-९८६०८०५८७२ |
| २ | अनुदानित आश्रमशाळा, कोका (जंगल)त. भंडारा | १ ते १२ | माध्य. मुख्या. –श्री. एन.जी.बुराडे | मो.नं.७५८८७८९४०७ |

कालबध्द कार्यक्रम:-

| अ.क्र. | नियोजन | संभाव्य कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रवशपात्र विद्यार्थ्याचे सर्वेक्षण | दिनांक २० एप्रील ते ३० एप्रील |
| २ | शाळेस लागणा-या अन्नधान्य व ईतर साहित्याची मागणी नोंदबिणे | दि. २ मे ते १५ मे |
| ३ | शाळा पुर्वतयारी(पंधरवाडा नियोजन) | दि. २५ जुन ते १० जुलै |
| ४ | प्रवेश प्रक्रीया (प्रवेश अर्ज स्विकृती) | दि. २ मे ते ३० सप्टें. |

| | | |
|---|---|---|
| ५ | साहित्य वाटप | दि. २५ जुन ३० जुन |
| ६ | भाजीपाला पुरवठा आदेश प्राप्त करुन घेणे | दि. २ मे ते २५ जुन |
| ७ | मुल्यमापन चाचण्या | महिण्यातुन किमान एक चाचणी |
| ८ | प्रथम सत्रात परिक्ष | दिवाळीपुर्वी |
| ९ | द्वितिय सत्रात परिक्षा | एक एप्रील ते १५ एप्रील |
| १० | क्रिडास्पर्धा आयोजन(केंद्रस्तर) | आक्टोबरचा शेवटचा आठवडा |
| ११ | क्रिडास्पर्धा (प्रकल्प स्तर) | नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| १२ | सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन | २६ जानेवारी |
| १३ | पालक मेळावा | जुन महिण्याचा शेवटचा आठवडा |
| १४ | शाळा व्यवस्थापन समिती | जुलै महिण्याचा पहिला आठवडा |

## ४) आदिवासी मुला/मुलींकरीता शासकीय वसतिगृह

उद्देश:-

अनुसुचित जमातीच्या मुलां/मुलींकरिता उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची त्यांच्या शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने सदर योजनरा सुरु करण्यात आलेली आहे. शासकीय वसतिगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, अंथरुण-पांघरुण, पाठ्यपुस्तक शैक्षणिक व ईतर आवश्यक साहित्य मोफत पुरविण्यात यावे या उद्देशाने आदिवासी मुलां/मुलींकरिता शासकीय वसतिृहांची निर्मिती करण्यात आली आहे.

स्वरुप:- प्रवेशाची टक्केवारी

| अ.क्र. | शैक्षणिक स्तर | माध्यामिक विभाग | क. म. विभाग | वरिष्ठ महा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | तालुकास्तर वसतिगृह | १०% | २५% | ६५% |
| २ | जिल्हास्तर वसतिगृह | ----------- | ३०% | ७०% |

पात्रता:-

१) विद्यार्थी अनुसुचित जमातीचा असावा.

२) तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा

३) विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/- पेक्षा अधिक नसावे.

४) विहित नमुन्यात शाळा सोडल्याचा व प्रवेश घेतल्याचा दाखला, गुणपत्रिका, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, वर्तणुकीचा दाखला आणि फोटोसह अर्ज निकाल लागल्यापासुन १५ दिवसाचे आंत On Line सादर करावा.

वैशिष्ट्ये:-

१) भोजन:-विद्यार्थ्याकरीता सकाळी नास्ता व दोनवेळाचे भोजन शासन निर्णया प्रमाणे देण्यात येते.

सद्यस्थितीत शासन नियमाप्रमाणे जिल्हास्तरावरील वसतिगृहाकरिता भोजनाकरिता विद्यार्थ्यांना डिबि.टी. देण्यात येते व तालुका स्तरावरील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा देण्यात येतो.

२) निर्वाह भत्ता:-

अ) जिल्हास्तर दरमहा रु. ६००/- प्रत्येकी

ब) तालुकास्तर दरमहा रु. ५००/- प्रत्येकी

क) मुलींकरिता स्वच्छता प्रसाधनासाठी अतिरिक्त रु. १००/- दरमहा प्रत्येकी

इतर सोयी:-

अ) शालेय गणवेषाकरिता रु. ५००/- प्रमाणे प्रत्येकी दोन जोड दरवर्षी देण्यात येते.

ब) महाविद्यालयीन स्तर (कनिष्ठ व वरिष्ठ) जेथे ड्रेस कोड असेल तेथे प्रति विद्यार्थी रु. १०००/- प्रमाणे दोन जोड देण्यात येते.

क) वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अॅप्रापसाठी रु. ५००/- प्रति विद्यार्थी दरवर्षी, वैद्यकीय साहित्यासाठी रु. १०००/- स्टेथोस्कोपसाठी रु. १०००/-व ईतर साहित्यासाठी रु. १०००/- दरवर्षी देण्यात येते.

ड) अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी बॉलर सुटसाठी प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी रु. ५००/- ड्रॉईंग बोर्ड व ईतर साहित्यासाठी रु. २५००/-, लॅब अॅप्रानसाठी रु. ५००/- प्रति विद्यार्थी देण्यात येते.

इ) शारिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेषासाठी रु. ४०००/- देण्यात येते.

ई) छत्री रेनकोटसाठी व गमबुटकरिता रु. ५००/- देण्यात येते.

फ) कलाशाखेतील चित्रकला, संगीत व ईतर दवी/पदवीका तसेच विज्ञान व वाणिज्य शाखेतील आवश्यक साहित्यासाठी रु. ४०००/- प्रति विद्यार्थी दरवर्षी देण्यात येते.

ग) शैक्षणीक सहलीसाठी प्रत्येकी रु. २०००/- कार्यशाळेकरिता रु. ५००/-, प्रोजेक्ट रिपोर्टसाठी रु. १०००/- (प्रति प्रकल्प) ददेण्यात येते.

संपर्क:-

संबंधित वसतिगृहाचे गृहपाल

तक्रार निवारणासाठी सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | विद्यार्थी क्षमता | सद्यस्थितीत इमारत क्षमता | गृहपालाचे नांव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह क्र.१, भंडारा. | ७५ | ७५ | श्री.आय.डी. तागडे | ९४२०८८६४१५ |
| २. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह क्र.२ भंडारा | १२५ | ७५ | श्री. अविनाश मांढळकर | ७०८३१०८८४२ |
| ३. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह क्र.१ भंडारा | ७५ | ७५ | श्रीमती. पी. वाय. केकडे | ९८३४५४२३३४ |
| ४. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह क्र.२ भंडारा | १२५ | ६० | कु. एस. एस. पाटील | ८८३०२२८१२३ |
| ५. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, पवनी | ७५ | ६० | श्री. एल. एस. गेडाम | ९३७११३०५७४ |
| ६. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, तुमसर | ७५ | ७५ | श्री. व्ही. व्ही. तितरमारे | ८२७५४१३४२५ |
| ७. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, तुमसर | ७५ | ७५ | कु. के. सी. कोकाटे | ८८३०२२८१२३ |
| ८. | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, साकोली | ७५ | ७५ | श्री. वाहिद शेख | ९४२१७९५००७ |
| ९. | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह साकोली. | ७५ | ७५ | कु. पी. ए. साकोरे | ९९२३६०४१५६ |

कालबध्द कार्यक्रम:-

| अ.क्र. | नियोजन | संभाव्य कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रवेश प्रक्रीयेबाबत | |
| | १) प्रवेश अर्ज स्विकृती (ऑनलाईनद्वारे) | इयत्ता १०वी व १२ वी चा निकाल लागल्यापासुन १५ दिवस |
| | २)प्रवेश यादी तयार करुन मंजुरी घेणे | पुढील पाच दिवस |
| | ३)प्रवेश यादी प्रकाशित करणे | यापुढील पांच दिवस |
| २. | ईतर | |
| | अ) भोजन ठेका प्रक्रीया | १० मे १० जुन पर्यंत प्रवेश होताच |
| | ब) साहित्याचे वाटप | १ जुलै ते ५ जुलै पर्यंत व प्रवेश होताच |
| | क)विविध देयकांची रक्कमअदा करणे | दर महिण्याचे १० तारखेचे आंत |
| | ड) सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन | जानेवारी महिण्यात |

## ५) नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देणे

उद्देश:-

आदिवासी विद्यार्थ्यांना मोठ्या शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत बिगर आदिवासी विद्यार्थ्यासोबत इंग्रजी माध्यमातुन शिक्षण देण्याच्या दृष्टिने या योजनेमध्ये आदिवासी दुर्गम भागातील ईयत्ता पहिली करिता प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची निवड करुन शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पाठविण्यात येते.

स्वरुप:-

या योजनेअंतर्गत प्रकल्प कार्यालय, भंडारा कडुन खालीलप्रमाणे नमांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी दाखल करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | नामांकित शाळेचे नांव | इयत्ता | शैक्षणिक वर्ष | एकुण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानदिप कॉनव्हेंट, रामटेक जि. नागपूर | १ ते १० | २०२०-२१ | ८९ |
| २. | पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, कारधा त. जि. भंडारा | १ ते १० | २०२०-२१ | १३७ |
| ३. | आदर्श संस्कार विद्यालय, नंदनवन, नागपूर | १ ते १० | २०२०-२१ | ०१ |
| | एकुण- | | | २२७ |

वैशिष्ट्ये:-

१) आदिवासी विद्यार्थ्यांना बिगर आदिवासी विद्यार्थ्यांसोबत नामांकित शाळेत दर्जेदार शिक्षण देण्यात येते त्यामुळे त्यांच्या बौध्दिक क्षमतेचा विकास होण्यास मदत होते.

२) दृकश्राव्य साधनांचा वापर करुन अध्यापन केले जाते.

३) शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा शारिरिक, सांस्कृतिक विकास होण्याच्या दृष्टिने तज्ञ मार्गदर्शकाकडुन अध्यापन दिल्या जाते.

पात्रता:-

१) विद्यार्थी अनुसुचित जमातीचा व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२) दि. ३१ जुलै रोजी विद्यार्थ्याचे वय ६ वर्षापेक्षा कमी नसावे.

३) विद्यार्थ्याचे पालकाचे उत्पन्न रु. १०००००/- चे आत असावे.

४) विद्यार्थ्याचे पालक शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नसावे.

सोबत जोडावयाचे कागदपत्रे:-

प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे:-

१) जातिचा दाखला उपविभागीय अधिकारी यांचा असावा.

२) जन्म तारखेचा दाखला असावा.

३) आई वडिलांचे प्रतिज्ञापत्र

४) रहिवासी दाखला

५) विद्यार्थ्याचे दोन फोटो

६) विद्यार्थ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र

७) तहसिलदाराचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र

प्रवेश करीता संपर्क प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा

## ६) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेत प्रवेश देणे

उद्देश:-

अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण देऊन त्यांना सैन्यात नोकरी मिळवुन देण्यासाठी कार्यक्षम करणे. विद्यार्थ्यांनी सैनिकी शाळेतुन शिक्षण घेतल्यास ईयत्ता १२ वी नंतर प्रवेश प्रक्रीयेनुसार एन.डी.ए. मध्ये प्रवेश मिळु शकतो.

सद्यस्थितित या प्रकल्पांतर्गत ईयत्ता ६ ते १२ पर्यंतचे एकुण ४५० विद्यार्थी निर्धनराव वाघाये पाटील, विद्यालय, लाखनी येथे शिक्षण घेत आहेत. सदर शाळा २००८-०९ मध्ये सुरु झालेली असुन सन २००८-२००९ मध्ये पहिली तुकडी सुरु झाली. सध्या ह्या शाळेत ईयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत तुकड्या आहेत. भंडारा प्रकल्प प्रति विद्यार्थी प्रति वर्ष रु. २००००/- खर्च करते. शाळेत विद्यार्थ्यांना दोन वेळ जेवण, नास्ता, गणवेश, सैनिकी शाळेचे गणवेश विद्यार्थ्यांना पुरविले जाते. शाळेत प्रवेश घ्यावयाचा असल्यास विद्यार्थी ५ थी उत्तीर्ण असावा तसेच त्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. १०००००/- चे वर नसावे. सद्यस्थितित सैनिकी शाळेत फक्त मुलांनाच प्रवेश दिला जातो.

## ७) आदिवासी उमेदवाराची सेवायोजन अंतर्गत नाव नोंदणी करणे

उद्देश:-

भंडारा जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार आदिवासह दमेदवारांना त्यांच्या शैक्षणीक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने या कार्यालयात आदिवासी उमेदवारांची सेवायोजन अंतर्गत नांव नोंदणी करण्यात येते. इतर विभागाच्या मागणीप्रमाणे त्यांच्या नांवांची शिफारस करुन संबंधित विभागांना याद्या पुरविल्या जातात.

वैशिष्टये:-

१) उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार प्राप्त होतो.

२) आदिवासी सुशिशिक्षित बेरोजगारांची गणना करता येते.

३) आदिवासी युवकांना रोजगार प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या उत्पनात वाढ होते व त्यांचे जिवनमान उंचावते.

४) अनुसुचित जमातीचा विविध खात्यात शिल्लक असलेला नोकरीविषयक अनुषेश भरण्यास मदत होते.

आवश्यक कागदपत्रे:-

१) उपविभागीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीचा जातीचा दाखला

२) शैक्षणीक पात्रतेच्या गणपत्रिका

३) जन्म दिनांकासाठी शाळा सौडल्याच्या दाखल्याची प्रत

४) रहिवासी (ग्रामसेवक)दाखला

५) राशन कार्डाची प्रत

६) आधार कार्ड

पात्रता:-

१) उमेदवार हा अनुसुचित जमातीचा असावा.

२) उमेदवार हा भंडारा जिल्ह्यातील रहिवासी असावा.

३) उमेदवाराची किमान शैक्षणीक पात्रता ४थी उत्तीर्ण असावी.

४) उमेदवार कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय विभागात नोकरित नसावा.

संपर्क:-

१. कनिष्ठ लिपिक

२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी

## ८) सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

उद्देश:-

इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या आदिवासी मुले व मुलींमधील गळती कमी करणे व त्यांचा शैक्षणिक आणि ईतर किरकोळ खर्च भागविता यावा म्हणुन शिष्यवृत्ती देणे.

स्वरुप:-

सदर योजनेअतर्गत देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्तीचे दर |
|---|---|---|
| १. | १ ली ते ४ थी | १०००/- |
| २. | ५ वी ते ७ वी | १५००/- |
| ३. | ८ वी ते १० वी | २०००/- |

पात्रता:-

१) विद्यार्थी हा अनुसुचित जमातीचा असावा.

२) शासकीय व अनुदानित आश्रमशाळामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिल्या जात नाही.

३) नामांकित, सैनिकी, इंग्रजी माध्यमाच्या शाळामध्ये शिक्षण घेत असलेल्या ज्यामध्ये शासनाकडुन त्यांच्या शिक्षणाचा

खर्च अदा केल्या जातो अशा अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

४) विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. १०८०००/- पेक्षा अधिक नसावे.

५) विद्यार्थ्याची उपस्थिती प्रतिमाह ८०% असणे अनिवार्य आहे.

६) अनुत्तीर्ण झालेल्या विवद्यार्थ्याना त्याच ईयत्तेत दुस-यांदा सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. मात्र उत्तीर्ण होऊन वरच्या ईयत्तेत प्रवेश मिळाल्यास त्या ईयत्तेत सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

७) इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांचे पालकासोबत राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते असावे.

८) इयत्ता ५ वी ते ते १० वी च्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत वैयक्तीक बँक खाते असावे.

अर्ज करण्याची पध्दत:-

१) विद्यार्थी व त्याचे आई/वडील यांनी विहित नमुन्यात शाळेच्या मुख्याध्यापकाकडे उत्पन्नाच्या दाखल्यासह अर्ज करावा. आई/वडील ह्यात नसल्यास विद्यार्थ्याच्या पालकांनी आई/वडीलांच्या मृतयु प्रमाणपत्रासह अर्ज करावा.

२) शाळेच्या मुख्याध्यापकाने विद्यार्थ्याच्या शाळेत असलेल्या नोंदवहिवरुन विद्यार्थी अनुसुचित जमातीचा असल्याबाबत प्रमाणीत करणे आवश्यक आहे.

३) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी दरवर्षी शाळेतील प्रवेश िश्चिती झाल्यापासुन एका महिण्याच्या आंत किंवा अखेरपर्यंत पात्र विद्यार्थ्याचे अर्ज जमा करुन घेऊन छाननी करुन संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेकडे जमा करावे.

संपर्क:-

१) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

२) गट शिक्षणाधीकारी पंचायत समिती

टिप:- सदर योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेली आहे. फक्त निधी ह्या विभागाकडुन वर्ग केल्या जाते.

## ९) आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना

(भारत सरकार मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती योजना)

उद्देश:-

शालांत परिक्षेनंतरचा किंवा माध्यामिक शाळेच्या पुढील अभ्यास करणा-या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पुर्ण करिण्याकरिता सहाय्य करणे सदर शिष्यवृत्ती मान्यताप्राप्त संस्थामध्ये संरु असलेला शालांत परिक्षेनंतरच्या किंवा माध्यामिक शाळेच्या पुढील मान्यताप्राप्त सर्व अभ्यासक्रमासाठी देण्यात येते.

स्वरुप:-

शिष्यवृत्तीचे मुल्य यात निर्वाह भत्ता, अपंग विद्यार्थ्याकरिता तरतुद, सक्तीच्या ना-परावा फीची प्रतिपुर्ती, अभ्यास दौ-याचा खर्च, प्रबंधाचे टंकलेखन/मुद्रण यांचा खर्च आणि अभ्यासक्रमाच्या पुर्ण कालावधीकरिता पत्रव्यवहाराद्वारे अभ्यास चालु ठेवणा-या विद्यार्थ्यांकरिता पुस्तक भत्ता, यांचा समावेश आहे. एकदा देण्यात आलेली शिष्यवृत्ती ही चांगली वागणुक आणि उपस्थितितील नियमितता यांच्या अधिन राहुन नुतनीकरण करण्यात येईल.

अधिक माहिती करिता :-

१) Regulation Governing the Award of Scholarship (Applicable from १-७-२०१०)

२) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक आदिशी-१२०४/प्र.क्र.-०९/का-१२/मंत्रालय, मुंबई दिनांक ९/८/२००४

संपर्क :-

१) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक
२) कार्यालयाचे संबंधित कनिष्ठ लिपीक
३) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

**१०) व्यावसायिक पाठयक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पुरक निर्वाह भत्ता देणे**

**उद्देश:-**

वैद्यकीय, अभियांत्रिकी , कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र दत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमातील महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मेट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत निर्वाह भत्ता दिला जात्तो. विद्यार्थी व्यावसायिक पाठयाक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी इत्यादी सर्व खर्च या निर्वाह भत्यातून भागवू शकत नाहीत. म्हणून व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उपरोक्त योजनेअंतर्गत पुरक भत्ता दिला जातो हा पुरक निर्वाह भत्ता भारत सरकार शिष्यवृत्ती अंतर्गत मिळणाऱ्या निर्वाह भत्तयाव्यतिरिक्त राहील.

**पात्रता:-**

१) विद्यार्थी व्यावसायिक पाठयक्रमात प्रवेशित असावा.
२) विद्यार्थी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती धारक असावा.
३) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
४) अनुत्तीर्ण विद्यार्थी त्या वर्षापुरता योजनेचा लाभ मिळण्यास अपात्र ठरेल.
५) जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र आहेत, परंतु त्यांना शासकीय वसतिगृहात किंवा व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न् महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, ते विद्यार्थी त्याची राहण्याची सोय खाजगी वसतिगृहात किंवा भाडयाने खोली घेऊन राहू शकतात.
६) स्थानिक विद्यार्थी किंवा स्वत:च्या घरी/ नातेवाईकांकडे राहणारे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र नाहीत.

**आवश्यक कागदपत्रे :-**

१) विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असल्याबाबतचे तसेच कोणत्या अभ्यासक्रमात प्रवेशीत आहे याबाबतचे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे प्रमाणपत्र.
२) विद्यार्थी व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेशित असलेबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेशीत असल्याबाबत शासकीय वसतिगृहात अधिक्षकाचे प्रमाणपत्र.
३) जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात वा व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही म्हणून खोली भाडयाने घेऊन राहत आहे त्यांनी द्यावयाची प्रमाणपत्रे -

अ) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केला होता पण प्रवेश मिळाला नसल्याचे रेक्टर (अधिक्षक) यांचे प्रमाणपत्र.
ब) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केला होता पण प्रवेश मिळाला नसल्याचे अधिक्षक / गृहपाल यांचे प्रमाणपत्र.
क) विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणचे किंवा घरमालकाचे प्रमाणपत्रसह विद्यार्थ्यांनी ते ठिकठिकाणी राहत असल्याबाबतचे शपथपत्र (ॲफीडेव्हीट)

**अधिक माहिती साठी:-**

१) शासन निर्णय क्रमांक:आविशि-१२०४/प्र.क्र.१८/का.१२मंत्रालय विस्तार मुंबई-३२. दिनांक:२४आगॅस्ट, २००४

**संपर्क :-**

१) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक
२) कार्यालयाचे संबंधित कनिष्ठ लिपीक
३) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

### ११) अनुसूचित जमातीच्या इयत्ता ८ वी ते १२ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती देणे

**उद्देश :-**

अपंग व्यक्तींना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन व त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा हेतू लक्षात घेऊन ते शिक्षणापासून वंचित राहू नयेत. तसेच त्यांना इतरांच्या बरोबरीने स्पर्धा करण्यासाठी अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांस अपंग शिष्यवृत्ती देणे व शाळेत येणे जाणे करीता वाहतुक भत्ता देणे.

**स्वरुप:-**

इयत्ता ८ वी ते १२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांस दरमहा रु. ५००/- प्रमाणे कमाल ५०००/- शिष्यवृत्ती देण्यात येते व शाळेत येणे जाणे करिता रु. १००/- प्रमाणे कमाल १०००/- वाहतुक भत्ता देण्यात येतो.

**पात्रता:-**

१) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२) विद्यार्थी किमान ४० टक्के अपंग असणे आवश्यक आहे.
३) मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी ज्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.
४) विद्यार्थ्याची हजेरी शाळेत ७० टक्के पेक्षा कमी नसावी.

**आवश्यक काबदपत्रे :-**

१) अनुसूचित जमातीच प्रमाणपत्र (उपविभागीय अधिकारी यांचे)
२) विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्याचे अधिक्ष / गृहपाल यांचे प्रमाणपत्र
३) जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंग असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
४) विद्यार्थ्यांची उपस्थिती ७०% पेक्षा जास्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र (मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे)

**अधिक माहिती साठी:-**

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-१००३/प्रक्र.४४(अ)का-१२,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक १४ ऑगस्ट, २००३.
२) आदिवासी विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक आवगृ-१००३/प्रक्र.४४(अ)का-१२ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक ५ मार्च, २००४,

**संपर्क:-**

१) संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/ प्राचार्य
२) कार्यालयाचे संबंधित लिपीक
३) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)

## १२) पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना

उद्देश :-

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश मिळावा म्हणुन अर्ज केला असेल व त्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नसेल तर अशा विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. परंतु सदर विद्यार्थी घेत असलेले शिक्षणाचा अभ्यासक्रम दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असावा. सदर योजना २०१६-१६ पासुन लागु आहे. तसेच २०१७-१८ शैक्षणिक वर्षापासुन शासकीय वसतिगृहात प्रवेश घेणे किंवा सदर योजनेचा लाभ घेणे यापैकी एक पर्याय निवडता येईल

**निकषः-**

अ) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा तसेच अर्जासोबत त्याचे जात पडताळणी प्रमाणपत्र संलग्न करणे आवश्यक आहे.

ब) विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न वार्षिक २.५० लक्ष पेक्षा अधिक नसावे.

क) एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर इतर शाखेच्या शिक्षणाकरिता सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

ड) विद्यार्थ्याला महाविद्यालयात प्रवेश मिळालेला असावा.

इ) ज्या ठिकाणी सदर योजनेचा लाभ घेणार असेल त्या ठिकाणचा तो रहिवासी नसावा.

फ) विद्यार्थी कोणत्याही प्रकारच्या नोरीत किंवा व्यवसाय करणारा नसावा.

ग) अपंग विद्यार्थ्याला प्राधान्य देण्यात येईल.

ह) सदर योजनेचा लाभ मिळाल्यानंतर विद्यार्थी त्या शहरात राणे बंधनकारक आहे.

य) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या संगणक प्रणालीद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.

## १३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प/ न्युक्लिअस बजेट योजना

उद्देश :-

ज्या योजनांचा समावेश अर्थसकंल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या व स्थानिक आदिवासीच्या गरजा लक्षात घेवून महत्वाच्या कर्जविरहित योजना तातडीने व प्रभावीपणे राबवून गरजू आदिवासी लाभार्थीना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.न्युक्लिअस बजेट योजनेअतर्गत पुडील प्रमाणे गट निहाय योजला समाविष्ट करण्यात येतात.

**स्वरुपः-**

**१.गट- अ उत्पन्न निर्मिती व वाढीच्या योजना**

या अंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना उत्पन्न वाढीसाठी विविध योजना प्रस्तावित करुन मा. वरिष्ठ कार्यालयाचे मंजुरीप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येते. यामध्ये आदिवासी लाभार्थ्याला त्याच्या गरजेप्रमाणे सर्वसाधारण आदिवासी लाभार्थ्यांना ८५% अनुदानावर उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात येतात.

**२.गट- ब प्रशिक्षणाच्या योजना**

या अंतर्गत आदिवासी युवक/युवतींना विविध व्यवसायाचे रोजगार व स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देण्यात येतात. आदिवासी युवक/युवती यांना सदर प्रशिक्षणानंतर रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्देश आहे. शिक्षण घेत असणाऱ्या युवक/युवतीं करीता वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा तयारी , नोकरी करीता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी, एम.एस.टी.आ.टी., संगणक प्रशिक्षण इ. विषयाचे प्रशिक्षण आयोजन करुन संबंधितांना लाभ मिळवून देण्यात येतो.

**३.गट क मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणत्मक योजना**

मानवी साधन संपत्तीच्या विकासामध्ये सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण योजना, क्रिडा, कला, साहित्य व संस्कृती ची जोपासना व संवर्धन करणे हयाचा समावेश होतो. आदिवासीची गुणवत्ता आणि व्यक्ती विकासाच्या योजना, विविध विकासाच्या योजना कार्यान्वित करुन त्यांना सुविद्य, सुदृढ व संपन्न नागरिक बनविणे हा या सर्व उपक्रमांचा अंतिम उद्देश आहे. त्यादृष्टीने विचार करता निवडक प्रमाणावर क्रिडा स्पर्धा आयोजित करणे, आदिवासीच्या कलाकृतीचे प्रदर्शन आयोजित करणे तसेच नृत्यकलेचे जतन व संवर्धन करणे उदबोधन व ज्ञानसंवर्धक मेळाचे आयोजित करणे, सामुहिक विवाह सोहळे आयोजित करणे इ. अशा प्रकारे स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून कार्यक्रमांची अंमलबजावणी करता येते.

**वरील सर्व योजनांमध्ये प्रती लाभार्थी/कुटूंब कमाल रु. ५००००/- पर्यंत आर्थिक मर्यादेत लाभ देण्यात येते.**

**पात्रता:-**

१. वरील सर्व योजनांच्या लाभाकरीता लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा. (उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक)
२. भंडारा जिल्हयातील रहिवाशी असावा. ( रहिवाशी प्रमाणपत्र तलाठी/ग्रामसेवक यांचे)
३. दारिद्रय रेषेखालील उमेदवारांना सर्व योजनांमध्ये प्राधान्य.
४. शेती विषयक जोजनांच्या लाभाकरीता जमीनीचा ७/१२, नमुना -८ अ, चतू:सिता नकाशा.
५. प्रशिक्षण विषयक योजनांकरीता प्रशिक्षण निहाय आवश्यक शैक्षणिक पात्रता.
६. निवडणूक आयोगाचे ओळखपत्र/राशन कार्ड/आधार कार्ड इत्यादी.

अधिक माहितीसाठी:- शा.नि.क्र.टिएसपी/न्युबयो/२०११/प्रक्र.८७/का-७/दि.२१.०६.२०१३ पहावा.

**संपर्क:-**

१. संबंधित लिपीक
२. सहाय्यक प्रकलप अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## १४) विशेष केंद्रिय सहाय्य योजना

**उद्देश:-**

अनुसूचित जमातीच्या कुटूंबांना उत्पन्न निर्मिती व वाढीच्या दृष्टीने विशेष करुन शेती विकास व शिक्षणाच्या योजना या अंतर्गत राबविण्यात येतात. तसेच दारिद्रय रेषेखालील बेघर आदिवासींकरीता घरकुल बांधून देणे, विविध व्यवसाय करण्याकरिता सहाय्य करणे इत्यादीकरीता विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत योजना राबविण्यात येतात.

**स्वरूप:-**

यामध्ये प्रामुख्याने आदिवासी लाभार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार विषयक सहाय्य करण्यसत येते. आदिवासी शेतकऱ्यांसाठी शेतीला आवश्यक अवजारे, साहित्य पुरवठा करण्यात येते. जसे ठिंबक सिंचन संच, तुषार सिंचन संच, जैविक खते/ रासायनिक खते पुरवठा करणे नविन विहीरी खोदकाम करणे, बोअरवेल करणे, विजपंप/तेलपंप पुरवठा करणे, पाईपलाईन करुन देणे, पॉली हाऊस उभारणी करणे, फळबाग लागवडीस सहाय्य करणे, वनौषधी लागवड, परसबाग लागवड इ. करीता सहाय्य करणे, व्यवसाय उद्योगासाठी आवश्यक व्यवसाय निहाय साहित्य पुरवठा करणे, योजनानिहाय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे इ. योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. तसेच दारिद्रय रेषेखालील बेघर आदिवासी कुटूंबांना घरकुल योजनेतंर्गत घरकुल बांधून देणे इ. योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

**लाभार्थी पात्रता:-**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. शेती विषयक योजनांकरीता ७/१२, नमुना ८अ, जमीनीचे चतु:सिमा नकाशा
३. योजना निहाय दा. रे. प्रमाणपत्र
४. ओळखपत्र (निवडणुक आयोगाचे)/आधार कार्ड/ इतर फोटो ओळखपत्र
५. योजना निहाय वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयाचे अटींप्रमाणे आवश्यक बाबी.

**संपर्क:-**

१. संबंधित लिपीक
२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## १५) भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत सहाय्य

**उद्देश :-**

आदिवासी समाजाला अती महत्वाच्या अपुऱ्या पायाभूत भौतिक सुविधांची पूर्तता करणे ज्या सुविधांसाठी नियमित अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद होवू शकत नाही. अशा पायाभूत सुविधांकरीता विशष बाब म्हणून तरतूद या अंतर्गत करण्यात येते. यामध्ये आदिवासी समाजाचे जिवनमान उंचावणे हा मुख्य उद्देश आहे. आदिवासी गावांना दळणवळण करीता रस्ते विकास करणे, पाणी पुरवठा, विज पुरवठा, धरणे, तलाव , घरकुल इ. योजना मुख्याने राबविण्यात येतात.

**संपर्क:-**

१. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.
२. संबंधित लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## (ब) आर्थिक उन्नतीच्या योजना

## १६) आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप पुरवठा योजना

**उद्देश:-**

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचा किफायतशीरपणे विकास होणाऱ्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनाचा व सुविधाचा पुरेपुर उपयोग करून त्याद्वारे जमिनीची उत्पादकता वाढविणे.

**स्वरूप:-**

या योजनेखाली सर्वसाधारणपणे ५ अश्वशक्तीचे तेलपंप मंजुर करण्यात येतात. आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने १०० टक्के अनुदानावर तेलपंप पुरविण्यात येत आहे.

**पात्रता:-**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. लाभार्थी हा भंडारा जिल्हयाचा असावा.
३. किमान ६० आर (१.४८३ एकर) ते कमाल ६.४७५ हेक्टर (१६ एकर) पर्यंत जमिन उपलब्ध असावी. व स्वत: जमिन कसत असला पाहिजे.
४. किमान सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक. (ऑगस्ट ते जानेवारी पर्यंत)
५. ज्या लाभार्थ्याकडे विजेची सुविधा नाही ते लाभार्थी ऑईल इंजिनचा लाभ घेऊ शकतो.
६. विहीत जमिनीच्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र धारण करणारे दोन किंवा तीन शेतकरी देखील योजनेचा संयुक्त पणे लाभ घेवू शकतो.
७. कुटूंबातील एकाच सदस्याला लाभ मिळेल. कुटूंब विभक्त दाखवून लाभाची मागणी केल्यास लाभ मिळणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे:-**

१. जातीचे प्रमाणपत्र (उपविभागीय अधिकारी यांचे)

२. दारिद्रय प्रमाणपत्र

३. अर्जदाराचा जमिनीचा ७/१२, नमुना ८अ, चतु:सिमा नकाशा

४. जमिन सामाईक असेल तर इतर हक्कदाराचे संमतीपत्र तसेच ७/१२ उताऱ्यामध्ये एकापेक्षा जास्त शेतकऱ्यांचा नावाचा समावेश असेल तर त्या शेतकऱ्यांने तहसिलदार यांच्या समक्ष ॲफिडेव्हीट करणे आवश्यक.

५. रहिवासी दाखला

६. पाणी उपलब्धतेबाबत तहसिलदार यांचे पाणी परवानगी.

७. ओळखपत्र

८. ग्रामपंचायत ठराव

९. इतर कागदपत्रे

**अधिक माहितीकरीता:-**

१. शासन निर्णय क्रमांक: इएमपी-१०९२/प्र.क्र.४२/(९२)/का.५, दिनांक: १६ जुलै, १९९२.

**संपर्क:-**

१.संबंधित लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

३.प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, भंडारा जि. भंडारा (लाभार्थी निवड यादी मंजुरी नंतर वाटप करीता लाभार्थ्यांनी यांचेशी संपर्क साधावा

## १७) आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी./ एच.डी.पी.इ पाईपचा पुरवठा करणे

**उद्देश व स्वरुप :-**

आदिवासी लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असुन शेतकऱ्यांना आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी १०० टक्के अनुदानावर तेलपंप मंजुर करून या योजनेशी संलग्न दारिद्रय रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना शेतीचा विकासासाठी पी.व्ही.सी./ एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे.

**पात्रता:-**

१. अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा.

२.ज्या लाभार्थ्यांना तेलपंप मिळालेला आहे. त्या लाभार्थ्यांनाच सदर योजनेचा लाभ दिला जाईल.

३.विभक्त कुटूंब दाखवून लाभाची मागणी करणाऱ्या व्यक्तींना लाभ देता येणार नाही.

४. लाभार्थी हा भंडारा जिल्हयाचा असावा.

**आवश्यक कागदपत्रे:-**

१. जातीचे प्रमाणपत्र (उपविभागीय अधिकारी यांचे)

२. अर्जदाराचा जमिनीचा ७/१२, नमुना ८अ, चतु:सिमा नकाशा

३.पाणी उपलब्धतेबाबत तहसिलदार यांचे पाणी परवानगी

४. रहिवासी दाखला

५.ग्रामपंचायत ठराव

६.इतर कागदपत्रे

**अधिक माहितीसाठी वाचा:-**

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक पि.व्ही.सी. २००४/प्र.क्र.-५५/का-८/दिनांक २४ ऑगस्ट २००४.

२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.-९/का-६/दिनांक एप्रिल २००८

३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एचडीपीई-२०१२/प्र.क्र.१३५/का-९, दिनांक २४.१२.२०१३

४. व्यवसायिक संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे पत्र क्रमांक आविम/प्र.शा./विकास/१६०/२०१३, दिनांक ९.४.२०१३

५. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र क्रमांक-विकास-२०१२/प्र.क्र.३०/का-३(६) दिनांक ६.६.२०१३

६. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एचडीपीई-२०१२/प्र.क्र.१३५/का-९, दिनांक २४.१२.२०१४

सदर योजना आदिवासी विकास महामंडळमार्फत राबविली जाते.

**१८) भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना**

**उद्देश:-**

दारिद्रय रेषेखालील भूमिहीन कुटूंबांना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्ती मजुरी करावी लागते. मजुरीवरील अवलंबित्व कमी व्हावे व कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन आवश्यक आहे. म्हणुन भुमिहीन आदिवासींना जमिन उपलब्ध करुन दिली जाते.

**स्वरुप :-**

१. सदरच्या योजनेतंर्गत ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याज कर्ज स्वरुपात निधी दिला जातो.

२. भूमिहीन कुटूंबास ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर ओलिताखाली जमीन उपलब्ध करुन दिली जाते.

**पात्रता :-**

१. अर्जदार हा अनुसूचित जमातीचा असावा.

२. लाभार्थी हा भंडारा जिल्हयाचा असावा.

३. दि. ०१.०१.२००५ या दिनांकास भूमिहीन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र समजण्यास यावा.

४. अर्जदाराचे वय २५ किंवा ६० इतके असावे व तो भूमिहीन असावा.

५. अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील असावा.

६. महसुल व वनविभागाने ज्या कुटुंबांना गायरान व अतिरिक्त जमिनीचे वाटप केले आहे, अशा कुटूंबांना लाभ मिळणार नाही.

७. ज्या आदिवासी व्यक्तींच्या विरुध्द जमिनीचा अतिक्रमणाबाबतची प्रकरणे अतिक्रमण अधिनियम महसुल अधिकाऱ्याकडे प्रलंबित आहे. त्यांना या योजनेचा लाभ देता येणार नाही.

८. लाभार्थी कुटूंबाला जमीन उपलब्ध करुन दिल्यानंतर ती अन्य कोणत्याही व्यक्तीला विक्रीद्वारे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव हस्तांतरित करता येणार नाही.

९. विभक्त कुटूंब दाखवून लाभाची मागणी करणाऱ्या व्यक्तींना लाभ देता येणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे:-**

१. दारिद्रयरेषेखालचा दाखला

२. जातीचे प्रमाणपत्र (उपविभागीय अधिकारी यांचे)

३. रहिवासी दाखला

४. भुमिहीन असल्याबाबतचा दाखला

५. शाळा सोडल्याचा दाखला/ वयाचा दाखला

**अधिक माहिती करीता वाचा:-**

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक भुवाये – २००३/प्र.क्र.-१४२/का-९/मंत्रालय विस्मार भवन मुंबई दिनांक २४ फेब्रुवारी,२००४

२. शासन शुध्दीपत्रक क्र. भूवायो-२००३/प्र.क्र.१४२/का.९ दिनांक ५ नोव्हेंबर, २००५

३. शासन निर्णय क्र. भुवयो-२००९/प्र.क्र.१२६/का.०९ दिनांक ४ फेब्रुवारी, २०१०.

**संपर्क:-**

१. संबंधित लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## १९) शबरी घरकुल योजना

**स्वरुप:-**

आदिवासीच्या सर्वांगीण विकासाकरीता तसेच अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत सन २०१२-१३ पासुन आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. घरकुल २०१२/प्र.क्र.३८(भाग-१) /का १७ मंत्रालय, मुंबई- ४०००३२, दि. २८ मार्च २०१३ अन्वये शबरी घरकुल योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत आदिवासी समाजाच्या लाभार्थ्यास खालीलप्रमाणे लाभ देण्यात येतो.

| | |
|---|---|
| १. ग्रामीण क्षेत्राकरीता | :अ) सर्वसाधारण क्षेत्राकरीता (शौचालय बांधकामासह) रु.१३२०००/- |
| | :ब) नक्षलग्रस्त डोगराळभागात (शौचालय बांधकामासह) रु.१४२०००/- |
| २. शहरी क्षेत्राकरीता | :क) वार्षीक उत्पन्न रु. ३०००००/- पर्यंत असलेल्या घरकुल बांधकामासाठी रु. २५००००/- देय राहील. |

**निकष :-**

**आदिवासी घरकुल योजनेसाठी खालीलप्रमाणे निकष ठरविण्यात आले आहेत.**

१) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.

२) लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे.

३) लाभार्थ्याकडे स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन असावी.

४) लाभार्थ्याकडे स्व:ताचे किंवा कुटंबाचे पक्के घर नसावे.

५) लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेद्वारे करण्यात यावी.

६) लाभार्थी कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न ग्रामिण भागाकरीता रु १.०० लक्ष व शहरी भागाकरीता ३.०० लक्ष चे आत असावे.

७) लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११(SECC-2011) प्राधान्य क्रम यादीच्या (Generated priority list) निकषाबाहेरील नसावा.

**प्राधान्य क्षेत्र:**

**घरे बांधतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येतो.**

अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.

आ) ॲट्रासिटी ॲक्टनुसार पिडीत झालेल्या अनुसूचित जमातीच्या पात्र व्यक्ती.

इ) पुरग्रस्त क्षेत्र

ई) घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा महिला.

उ)अपंग (विकलांग) लाभार्थी व्यक्ती

ऊ) शासकीय अभिकरणामधून निवड झालेल्या व्यक्तींना परिच्छेद अनुक्रमांक २ नुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

ऋ) उर्वरित क्षेत्र

**अधिक माहितीसाठी वाचा :-**

१. आदिवासी विकास शासन निर्णय क्र. घकुल -२०१२/प्र.क्र.३८(भाग-१)/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक २८ मार्च,२०१३

२. आदिवासी विकास शासन निर्णय क्र. घकुल -२०१२/प्र.क्र.३८(भाग-१)/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक ७ ऑगस्ट,२०१४

३. आदिवासी विकास शासन निर्णय क्र. घकुल -२०१६/प्र.क्र.३७/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक १५ मार्च,२०१६

४. आदिवासी विकास शासन निर्णय क्र. घकुल -२०१६/प्र.क्र.३७/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक २८ जुन,२०१६

५.आदिवासी विकास शासन निर्णय क्र. शघयो -२०१६/प्र.क्र.३३६/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक ०७ जानेवारी,२०१६

६.आदिवासी विकास शासन निर्णय क्र. शघयो-२०१६/प्र.क्र.३७/का.१७.मंत्रालय मुंबई दिनांक ०६ जानेवारी,२०१७

**संपर्क:-**

१. **संबंधित लिपीक,** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

२. **सहाय्यक प्रकल्प अधिकारी,** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## २०) राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना

**उद्देश:-**

लग्न समारंभाच्या निमित्ताने मोठया प्रमाणवर होणारा खर्चकमी करण्यासाठी आणि विवाह प्रसंगी घेतल्या जाणाऱ्या कर्ज पध्दतीला आळा घालण्यासाठी व सामुहीक विवाह सोहळयांना प्रोत्साहण देण्यासाठी सन २००३-०४ पासुन ही योजना सुरु करण्यात आली आहे.

**स्वरुप:-**

सहभागी होणाऱ्या नवदाम्पत्यांना आर्थिक सहाय्य म्हणून या योजनेतंर्गत प्रती जोडपे रु. १००००/- आणि मेळावा आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थेला रु. १००००/- ऐवढी रक्कम देण्यात येते.

**पात्रता:-**

१. वर किंवा वधु दोघापैकी एक अनुसूचित जमातीचा असावा.

२. विवाहाच्या दिनांकास वधुचे वय १८ वर्ष व वराचे वय २१ वर्ष असणे आवश्यक आहे. मात्र वधु व वराचे वय विवाहाच्या दिनांकास ३५ वर्षा पेक्षा जास्त असु नये.

३. वर अणि वधुचा प्रथम विवाह असणे आवश्यक

४. विवाहापुर्वी दोन अपत्य झालेल्या दाम्त्यांस या योजनेचा लाभ मिळण्यासाठभ् "संबंधित जोडप्यांनी लग्न केले नाही. परंतु ते एकत्र राहिले आहेत व त्याला समाज मान्यता आहे". असा दाखला योजनेचा लाभ घेणाऱ्या जोडप्यांनी संबंधित ग्राम पंचायतीकडून घेवून लग्नाच्या सोहळयावुर्वी सादर करावा लागेल.

५.जोडपे महाराष्ट्र राज्यातील असावे.

**आवश्यक कागदपत्रे:-**

१. वर व वधुचा (अथवा दोन्ही पैकी एक) जातीचा दाखला (उपविभागीय अधिकारी यांचे).

२. बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंध कायदातंर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दामप्त्य/ कुटूंब यांच्याकडून झालेला नसावा. याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे. (100/- स्टॅम्प पेपरवर)

३. वर वधुचा शाळा सोडल्याचा दाखला

४. वर वधुचा रहिवासी दाखला

५.वर वधुचा यापुर्वी विवाह न झाल्याबाबतचा ग्रामसचिवाचा दाखला
६.संस्थेबाबत संस्था ही सार्वजनिक विश्वस्त अधिनियत १८५० खाली नोदणीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र

**अधिक माहितीसाठी वाचा:-**

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक सावियो-२००३/प्र.क्र./१७९/का-८/मंत्रालय, विस्तार मुंबई दिनांक ३ मार्च २००४
२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक सावियो-२००३/प्र.क्र./१७९/का-८/मंत्रालय, विस्तार मुंबई दिनांक १८ फेब्रुवारी २००९
३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक सावियो-२००९/प्र.क्र./१०२/का-८/मंत्रालय, विस्तार मुंबई दिनांक २५ नोव्हेंबर २००९
४. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रासअ-२०१३/प्र.क्र.१५१/का-१७/मंत्रालय, मुंबई दिनांक २६ नोव्हेंबर २०१३
५.शासन निर्णय, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७/मंत्रालय, मुंबई दिनांक ५ डिसेंबर २०१६

**संपर्क:-**

१. संबंधित लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.
२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## २१) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना

**उद्देश:-**

राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सन २००४-०५ पासुन ही योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेतंर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील ग्रामिण / नागरी भागातील आदिवासी उपाययोजना क्षेत्र अतिरिक्त आदिवासी योजना क्षेत्र / माडा/ मिनीमाडा, प्रस्तावित माडा मिनीमाडा क्षेत्र वा आदिवासी उपाययोजना क्षेत्राबाहेरील ५०% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्या/ वाडया/ पाडे/ गांव यामध्ये सामुहिक विकासाच्या सुविधा निर्माण करण्यात येत आहेत.

**स्वरुप:-**

| अ.क्र. | आदिवासी लोकसंख्या | वित्तीय तरतुद (लाखात) |
|---|---|---|
| १ | ४९९ पर्यत | ७.५० |
| २ | ५०० ते ९९९ | १२.५० |
| ३ | १००० पेक्षा जास्त | २०.०० |

वरील प्रमाणे एका वस्ती/ पाडे/ वाडया/ गावामध्ये योजनातंर्गत एकावर्षात आवश्यकतेनुसार रु.३१,२५,०००/- ऐवढी रक्कमेची कामे घेता येतील.

**योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामांची यादी:-**

| अ.क्र. | सामुहिक विकासाच्या सुविधा |
|---|---|
| १ | मुख्य वस्ती पर्यंत जोड रस्ते, सिमेंट कॉंक्रिट/ डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊंड |
| २ | पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, फिल्टर प्लॅन्ट उभारणे, पाणी पुरवठा योजना करणे, बोअर करणे, हातपंप बसविणे, सबमर्सिबल पंप बसविणे, सार्वजनिक हौद बांधणे |
| ३ | जुन्या विहीरीची दुरुस्ती, विहीरीचे खोलीकरण, गाळ काढणे, बोअरची दुरुस्ती, विंधन विहीरी पाईप वाढविणे, |
| ४ | बंद गटार बांधणे, नाल्या- मोऱ्या बांधणे |
| ५ | आदिवासी वस्तीचे विदयुतीकरण, मार्ग दिप बसविणे, अपारंपारिक उर्जाद्वारे मार्गदिप बसविणे |
| ६ | समाजमंदिर बांधणे, मंगल कार्यालय, वाचणालय, व्यायाम शाळा स्थापन करणे |
| ७ | सार्वजनिक शोचकुप व मुतारीचे बांधकाम करणे. |
| ८ | स्मशानभुमि बांधकाम |
| ९ | नदी काठाची संरक्षण भिंत, घाट बांधणे |
| १० | तिर्थ क्षेत्र व पर्यटन विकास |
| ११ | ग्रामपंचायत कार्यालय, ग्राम सचिवालय बांधकाम |

**पात्रता :-**

१. प्रस्तावित केलेल्या आदिवासी जमातीच्या वस्त्या/ पाडे/ वाडे/ गांव मध्ये एकुण लोकसंख्येच्या ५० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या अनुसूचित जमातीची असावी.

२. प्रस्तावीत कामे जिल्हा परिषद / आमदार / खासदार निधीतुन व इतर अन्य निधीतुन झालेली अथवा प्रस्ताव करण्यात आलेली नसावी.

**आवश्यक कागदपत्रे:-**

१. प्रस्तावीत कामा संदर्भात ग्रामपंचायतीचा ठराव.

२. प्रस्तावीत काम यापुर्वी झाले नसल्याचे अथवा कोणत्याही इतर योजनेतुन प्रस्तावित नसल्याचे ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र

३. प्रस्तावीत गावात ५०% पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असल्याचे प्रमाणपत्र- तहसिलदार व गट विकास अधिकारी यांचे

४. मालकीचे प्रमाणपत्र

**अधिक माहितीसाठी वाचा:-**

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आवसु-२००६/प्र.क्र.-७२/का-१४/मंत्रालय विस्तार मुंबई-०३२ दिनांक २६ जुन २००७

२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.-६/का-६/मंत्रालय विस्तार मुंबई -०३२ डिसेंबर २००९

३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आविवि-२०१०/प्र.क्र.-१७६/का-९/मंत्रालय विस्तार मुंबई-०३२ दिनांक २८ सप्टेंबर २०११

४. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ठवसु-२०१३/प्र.क्र.-३३/का-९/मंत्रालय विस्तार मुंबई-०३२ दिनांक १३ सप्टेंबर २०१३

५. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ठबायो-२०१७/प्र.क्र.-३३/का-९/मंत्रालय विस्तार मुंबई-०३२ दिनांक ६ मार्च, २०१७

**संपर्क:-**

१. संबंधित लिपीक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

२. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भंडारा.

## २२) आदिवासी सेवक पुरस्कार

शासन निर्णय क्र. आसेप-१०९९/प्र.क्र.६/का-५, दि.२७ जाने. १९९९ अन्वये १५ सामाजिक व्यक्ती किंवा ७ सामाजिक संस्थांना देता येतो. महाराष्ट राज्यातील आदिवासीच्या कल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कोणत्याही धर्म, पंथाच्या व्यक्ती तसेच संस्थांना आदिवासी सेवक पुरस्कार २५ ऑगस्ट १९८८ च्या आदेशानुसार मंजुर करण्यात येते. सदर पुरस्कार आद्यसेवक ठक्कर बाप्पा यांच्या जन्मदिनी म्हणजेच २९ नोव्हेंबर रोजी आयुक्त, आदिवासी विकास, म. रा. नाशिक यांच्याकडून साजरा केला जातो. सदर योजनेची नियमावली दि. २७ जाने. १९९९ च्या परिशिष्ट अ,ब,क मध्ये देण्यात आलेली आहे. व्यक्तीला आदिवासी सेवक पुरस्काराची रक्कम रु. १०,००१/- प्रति व संस्थेला रु. २५,००१/- देण्यात येते. त्या व्यक्तीला त्याच्या निवासस्थानापासुन ते आदिवासी सेवक पुरस्कार वितरणाच्यास स्थळापर्यंत रेल्वेचे पहिल्या वर्गाचे जाण्या-येण्याचे भाडे किंवा बस टॅक्सीचे प्रत्यक्ष भाडे पुरस्कार विजेत्या त्याची पत्नी अथवा पती हे प्रवासभत्यास पात्र असतील. संस्थेचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा संस्थेने प्राधीकृत केलेली व्यक्ती पात्र राहील. सदर व्यक्ती ०३ दिवस शासनाचे पाहुणे असतील.

आदिवासी सेवक पुरस्कारासाठी विहीत नमुन्यातील फॉर्म संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत अपर आयुक्त व अपर आयुक्त यांच्यामार्फत आयुक्त आदिवासी विकास पाठविले जातात. आदिवासी सेवक पुरस्कारासाठी शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आपल्या शिफारस पत्रासोबत पुढील माहितीसह आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांचेकडे अर्ज पाठविले जातात. अ) शिफारस केलेल्या व्यक्तीची पुर्ण माहिती ब) कोणतही गैरव्यवहार केला नसल्याचे प्रमाणपत्र क) शिफारस केलेल्या व्यक्ती विरुद्ध गैरवर्तणुकीबाबत खटला भरला नसल्याचे किंवा तिच्या वरील गैरवर्तणुकीबाबत किंवा सार्वजनिक निधीचा अफरातफर केल्याचा आरोप शाबीत झाला नसल्याचे प्रमाणपत्र ड) अर्जदाराने साध्य केलेली विशेष नेत्र दिपक कामगीरी इ) अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे तीन फोटो फ) परस्पर आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांचेकडे आलेल्या वैयक्तीक अर्जाचा विचार केला जाणार नाही.

संबंधित अधिकाऱ्याने शिफारस केली नसेल तर आयुक्त आदिवासी विकास नाशिक स्वत:च पाच व्यक्तीची शिफारस करु शकेल.

आदिवासी सेवा संस्था पुरस्कारासाठी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१) संस्था पब्लीक ट्रस्ट ॲक्ट व/वा सोसायटी रजिस्टेशन ॲक्ट १८६० अंतर्गत पजिबध्द असल्याचे प्रमाणपत्र

२) संस्थेचे कार्य पक्षातीत व राजकारणातुन अलिप्त असल्याचे प्रमाणपत्र

३) संस्थेच्या कार्याबाबतचा अहवाल

४) संस्थेच्या आर्थिक व्यवहारात कोणताही गैरव्यवहार नसल्याचे प्रमाणपत्र

५) संस्थेच्या घटनेची प्रमाणीत प्रत व मागील ०५ वर्षाचे अहवाल

आयुक्त सर्व अर्ज छाननी करुन शिफारशीसह पुढील कार्यवाहीसाठी निवड समितीकडे सादर करेल. निवड समिती प्रस्ताव तपासुन आपल्या शिफारसीसह शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडे मान्यतेसाठी सादर करतील. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पुरस्कार शासकीय निर्णयाद्वारे व राजपत्रानुसार जाहिर केले जातील. शासनाची मान्यता अंतिम असेल

व त्याविरुद्ध न्यायालयात अपिल करता येत नाही. एखाद्याला दिलेला पुरस्कार कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दाखविता रद्द करण्याचा अधिकार शासनाने राखुन ठेवलेला आहे. त्यांनतर तो पुरस्कार स्विकारलेल्या व्यक्तीने आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना परत केला पाहीजे.

## २३) माहितीचा अधिकार अधिनियम- २००५

| अ.क्र. | शाखा | जन माहिती अधिकारी | सहायक माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) ए.आ.वि.प्रकल्प | कार्यालय अधिक्षक | प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा |
| २ | लेखा शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) ए.आ.वि.प्रकल्प | सहायक लेखा अधिकारी (वित्त) | प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा |
| ३ | नियोजन शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) ए.आ.वि.प्रकल्प | सहायक प्रकल्प अधिकारी (नियोजन) | प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा |
| ४ | विकास शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) ए.आ.वि.प्रकल्प | सहायक प्रकल्प अधिकारी (विकास) | प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा |
| ५ | शिक्षण | सहायक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) ए.आ.वि.प्रकल्प | सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) | प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा |

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था जनगणना २०११ ची माडा पॅकेट यादी
## जिल्हा भंडारा

| अ.क्र. | जिल्हा | उपविभाग | तालुका | आदिवासी गावे | एकुण लोकसंख्या | त्यापैकी आदिवासी लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | तुमसर | तुमसर | सुसरडोह | ७६५ | ७०४ | ९२.०२६१ |
| २ | | | | कमकासुर | १९५ | १९५ | १०० |
| | | | | सितेकसा | २११ | १८६ | ८८.१५१७ |
| | | | | मांडवी | ९५७ | ० | ० |
| | | | | चिखली | १५२९ | ८६७ | ५६.७०३७ |
| | | | | गोवरीटोला | ७९४ | ३२ | ४.०३०२३ |
| | | | | देवारा | ५५४ | २२९ | ४१.३३५७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कुरमुडा | ८६४ | ३१५ | ३६.४५८३ |
| | | | | विटपुर | ३२० | ३२० | १०० |
| | | | | आलेसुर | १२१९ | १६ | १.३१ |
| | | | | खापा | ५८१ | ५५७ | ९५.८६९२ |
| | | | | लवादा | ४३७ | ३९१ | ८९.४७३७ |
| | | | | मंगरली | ४०९ | ३ | ०.७३ |
| | | | | रोंघा | १८२१ | ६४८ | ३५.५८४८ |
| | | | | रोंघा हमेशा | ० | ० | ० |
| | | | | लेंडेझरी | ६८५ | ३६३ | ५२.९९२७ |
| | | | | पांगडी | ३९ | ३४ | ८७.१७९५ |
| | | | | निलागोंदी हमेशा | ० | ० | ० |
| | | | | बघेडा | ३४५८ | ६७१ | १९.४०४३ |
| | | | | आसलपाणी | ६९३ | ३४१ | ४९.२०६३ |
| | | | | गारकाभोंगा | १३८ | ६३ | ४५.६५२२ |
| | | | | मोठागांव | ४७७ | १०७ | २२.४३१९ |
| | | | | जोगीवाडा | ० | ० | ० |
| | | | | पवनारखारी हमेशा | ९६३ | ६१२ | ६३.५५१४ |
| | | | | लक्ष्मीपुर | ० | ० | ० |
| | | | | पवनारखारी | १५६३ | ९१२ | ५८.३४९३ |
| | | | | येदरबुची | ८८० | ३९५ | ४४.८८६४ |
| | | | | सुंदरटोला | ९७३ | ५४१ | ५५.६०१२ |
| | | | | खंदाळ | ४४० | २६ | ५.९१ |
| | | | | गुडरी खुर्द | ३७१ | १६४ | ८०.१०९ |
| | | | | सोंदेपूर | ३६७ | २९४ | ८०.१०९ |
| | | | | टेमणी | १३६० | ८० | ५.८८ |
| | | | | गोंडीटोला | ११६२ | ७५ | ६.४५ |
| | | | | चुल्हरडोह | ३०० | ८२ | २७.३३३३ |
| | | | | रामपुर हमेशा | ८५० | ३७१ | ४३.६४७१ |
| | | | | खैरी | ० | ० | ० |
| | | | | भोंडकी | २१८ | ८४ | ३८.५३२१ |
| | | | | झारली | ६३३ | १३९ | २१.९५८९ |
| | | | | आग्री | २४९ | २२५ | ९०.३६१४ |
| | | | | नवेगाव | २८४ | ११४ | ४०.१४०८ |
| | | | | पचारा | ५३३ | १७७ | ३३.२०८३ |
| | | | | गायमुख | ३६६ | ३३८ | ९२.३४९७ |
| | | | | सोनपुरी | ८८ | ४७ | ५३.४०९१ |
| | | | | एकुण | २७७४६ | १०७१८ | ३८.६२९ |
| ४४ | भंडारा | साकोली | साकोली | बुंदेलघाट वि. | ० | ० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पांगडी वि. | ० | ० | ० |
| | | | | गिदलपार | ० | ० | ० |
| | | | | नवेगाव | ० | ० | ० |
| | | | | सोनेगाव | ५०४ | २४२ | ४८.०१५९ |
| | | | | उसगाव | १०७८ | १२२ | ११.३१७३ |
| | | | | मक्कीटोला | १५९ | ९८ | ६१.६३५२ |
| | | | | निप्परटोला | २३७ | ८९ | ३७.५५२७ |
| | | | | आतेगाव | ६२४ | ३२५ | ५२.०८३३ |
| | | | | पिटेझरी | ५७९ | ५१५ | ८८.९४६५ |
| | | | | पळसपाणी | १२४४ | ३०३ | २४.३५६९ |
| | | | | तुडमापुरी | १२१० | ६६६ | ५५.०४१३ |
| | | | | आलेबेदर | ८ | ० | ० |
| | | | | खैरलांजी | ६९१ | २१६ | ३१.२५९ |
| | | | | एकुण | ६३३४ | २५७६ | ४०.६६९ |
| | भंडारा | साकोली | लाखनी | पाउलदौना | ० | ० | ० |
| | | | | खुर्शिपार | ३५२ | २१६ | ६१.३६३६ |
| | | | | चिखलाबोडी | २७५ | १७९ | ६५.०९०९ |
| | | | | एकुण | ६२७ | ३९५ | ६३.०० |
| | | | | संपुर्ण बेरीज | ३४७०७ | १३६८९ | ३९.४४ |

**गोषवारा**

| अ.क्र. | जिल्हा | उपविभाग | तालुका | गावे | एकुण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भंडारा | | तुमसर | ४३ | २७७४६ | १०७१८ | ३८.६२९ |
| | | | साकोली | १४ | ६३३४ | २५७६ | ४.०६६९४ |
| | | | लाखनी | ३ | ६२७ | ३९५ | ६३.०० |
| एकुण | | | ३ | ६० | ३४७०७ | १३६८९ | ३९.४४२ |

| जनगणना — २०११ ची माहिती जिल्हा भंडारा गोषवारा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | क्षेत्र | गावांची संख्या | एकुण लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्या | टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | तुमसर | ओटीएसपी | ९५ | १९८३६२ | १४३६९ | ७.२४ |
| | | माडा | ४३ | २७७४६ | १०७१८ | ३८.६३ |
| | | एकुण | १३८ | २२६१०८ | २५०८७ | ११.१० |
| २ | मोहाडी | ओटीएसपी | १०७ | १५०६११ | ८९२६ | ५.९३ |
| ३ | भंडारा | ओटीएसपी | १४४ | २८००३० | १५६७७ | ५.६० |
| ४ | साकोली | ओटीएसपी | ७८ | १३०५४५ | १२०४२ | ९.२२ |
| | | माडा | १४ | ६३३४ | २५७६ | ४०.६७ |
| | | एकुण | ९२ | १३६८७९ | १४६१८ | १०.६७ |
| ५ | लाखनी | ओटीएसपी | ८१ | १२७९१८ | ७८४४ | ६.१३ |
| | | माडा | ३ | ६२७ | ३९५ | ६३.०० |
| | | एकुण | ६८ | १२८५४५ | ८२३६ | ६.४१ |
| ६ | पवनी | ओटीएसपी | १४० | १५४५८८ | १०१६७ | ६.५८ |
| ७ | लाखांदुर | ओटीएसपी | १०० | १२३५७३ | ६१७२ | ४.९९ |
| एकुण ओटीएसपी | | ओटीएसपी | ७४५ | ११६५६२७ | ७५१९७ | ६.४५ |
| एकुण माडा | | माडा | ६० | ३४७०७ | १३६८९ | ३९.४४ |
| एकुण भंडारा जिल्हा | | एकुण | ८०५ | १२००३३४ | ८८८८६ | ७.४१ |

## समारोप

आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रामध्ये रहिवासी आदिवासी बांधवांसाठी विविध योजना राबविण्याकरिता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,भंडारा येथे कार्यरत सर्व कर्मचारी अधिकारी वर्ग यांनी नागरीकांची सनद तयार करण्यात आली असून कार्यालयाअतंर्गत ज्या विविध योजनला व कार्यक्रम राबविण्यात येतात त्यांची इत्यंभुत माहिती संकलित करुन सदर सनद अद्वावत करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

नागरीकांची सनद या माध्यमातुन कार्यक्षेत्रातील आदिवासी बांधवापर्यत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना/कार्यक्रम पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

करिता धन्यवाद . . . . .

